## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :

माझे नाव : अमित जयसिंग रामकर
माझे वय : ३३ वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : कळंब, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. एस. आर. पाचारणे यांचे मार्फत

**१.** या प्रकरणातील घटना दिनांक ११.०५.२०१० रोजी घडली होती. दिनांक ११.०५.२०१० रोजी दूपारी दोन वाजता रेल्वेमध्ये नोकरी लावून देण्यासाठी मी संजय बनकर याला रोख रक्कम दीड लाख रूपये दिली होती. माझेसोबत संदिप भगवान दळवी व माझा चुलत भाउ नवनाथ शशिकांत रामकर यांनी प्रत्येकी दीड लाख रूपये रोख रक्कम संजय बनकर याला रेल्वेमध्ये नोकरी लावून देण्यासाठी दिली होती. पैसे दिल्यानंतर त्याच दिवशी संजय बनकर यांनी आम्हांला खासगी चारचाकी वाहनाने मुंबईमध्ये मांटुगा येथे सिमा मोहितकर हिच्याकडे घेवून गेला. सिमा मोहितकर हिच्याकडे गेल्यानंतर आमच्यासमक्ष संजय बनकर व सिमा मोहितकर यांच्यामध्ये चर्चा झाली. त्यानंतर आम्ही घेवून गेलेल्या शंभर रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर पैसे मिळाल्याचे सिमा मोहितकरने लिहुन दिले होते. आता मला तो स्टॅम्प पेपर दाखविण्यात आला. त्यावर सिमा मोहितकर हिची सही आहे. सिमा मोहितकर हिने आमचेसमक्ष सही केली होती. त्यामधील मजकूर बरोबर आहे. ते निशाणी क्र. २८ वर आहे. काही दिवसांनी संजय बनकर याच्याकडे नोकरीबाबत चौकशी केली असता संजय बनकर याने आम्हांला उडवाउडवीची उत्तरे दिली होती. त्यानंतर माझे चुलते शशिकांत रामकर सिमा मोहितकर हिच्या घरी गेले असता तिच्या घराला कुलुप असल्याचे माझे चुलते शशिकांत रामकर यांनी मला सांगितले होते. संजय बनकर याने आम्हांला नोकरी लावून देण्याची आमिष दाखवून आमच्याकडून दीड लाख रूपये घेवून आम्हांला नोकरी लावून न देता आमची फसवणुक केली. संजय बनकरला मी ओळखतो. त्याला बघितले तर मी ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर नाही.

(आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी क्र. ३९ वर दिलेला असून तो मंजूर करण्यात आला आहे.)

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एन. चासकर यांचे मार्फत.**

**२.** हे म्हणणे खरे आहे की मी कळंब येथे रामकर मळयात राहतो. माझे चुलते शशिकांत रामकर हे माझे शेजारीच राहण्यास असतात. हे म्हणणे खरे नाही की घटना घडली त्यावेळेस शशिकांत रामकर हे नारायणगाव येथे पेट्रोल टॅंकरच्या गाडीवर चालक म्हणून काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की घटना घडण्यापूर्वी शशिकांत रामकर हे पेट्रोल टॅंकरच्या गाडीवर चालक म्हणून काम करीत होते. घटनेच्या वेळेस माझे वडील हयात नव्हते. माझे शिक्षण दहावी पास असून मी आय.टी.आय पास आहे. ज्या वेळेस घटना घडली त्यावेळेस मी शेती करायचो. हे म्हणणे खरे आहे की रेल्वेमध्ये नोकरीबाबतची माहिती मला सर्वप्रथम माझे चुलते शशिकांत रामकर यांनी सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की रेल्वेच्या नोकरीसाठी शैक्षणिक अर्हता काय आहे याबाबत माझे चुलत्यांनी मला माहिती दिली होती. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नव्हता. आता साक्षीदाराला पोलिसांना घेतलेला त्याचा जबाब दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांना घेतलेले टिपण मी पहिल्यादांच न्यायालयात वाचत आहे. पोलिसांनी घेतलेल्या टिपण मधील माहिती मी पोलिसांना सांगितली होती.

**३.** हे म्हणणे खरे आहे की आरोपी हा रेल्वेमधील नोकरीची माहिती सांगण्यास माझे घरी आला नव्हता. साक्षीदार स्वतहुन सांगतो की आरोपी हा माझे चुलता शशिकांत रामकर याच्या घरी येत असल्यामुळे माझी त्याच्यासोबत माझे चुलत्याच्या घरी भेट झाली होती. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे खाते हे केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे खात्यामध्ये नोकरीच्या जागेबददल पेपरमध्ये जाहिरात येते. रेल्वेमधील खात्यातील नोकरीसाठी लेखी आणि तोंडी परिक्षा होतात की काय याबददल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आह`की मी रेल्वेच्या नोकरीसाठी कोणताही अर्ज किंवा फॉर्म भरलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला पैसे देण्यापूर्वी माझी आरोपीसोबत ओळख नव्हती. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला पैसे देण्यापूर्वी आरोपी माझे घरी येवून तुम्हांला रेल्वेमध्ये नोकरी लावून देतो व त्यासाठी तुम्ही पैसे भरा असे म्हणाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला पैसे दिले हे

दाखविण्यासाठी माझेकडे तोंडी शब्दाशिवाय दुसरा कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की पैसे स्विकारल्याची पोच सिमा मोहितकर हिने मला स्टॅम्प पेपरवर लिहुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला पैसे दिले व त्यांनी मला त्याबाबत लिहुन दिल्याची कुठलीही पोच माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की तुम्हांला रेल्वेमध्ये नोकरी लावून देतो असे आरोपी संजय बनकर याने मला लिहुन दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की आरोपीने एखादया उमेदवाराला नोकरी लावल्याचा पुरावा मला दाखविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी माझे चुलते शशिकांत रामकर याच्यावर विश्वास ठेवून सिमा मोहितकर हिला पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की संजय बनकरला पैसे दिल्याचा माझे तोंडी शब्दाव्यतिरिक्त इतर कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की दहावी पासचे शैक्षणिक कागदपत्र मी पोलिसांना फिर्याद देताना दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी किती शिकला आहे व काय करतो याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की सिमा मोहितकर नोकरी लावून देते याबाबत खात्री करण्यासाठी मी मुंबईला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की लिपीक पदासाठी दीड लाख रूपये व खलाशी पदासाठी सव्वा लाख रूपये लागतात याबददलची माहिती मला शशिकांत रामकर यांनी दिली होती. साक्षीदार स्वतहुन सांगतो की मला त्याबददलची माहिती आरोपीने दिली होती.

४. हे म्हणणे खरे आहे की सिमा मोहितकर रेल्वेमध्ये कोणत्या पदावर आहे व ती काय करते याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की सिमा मोहितकर हिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सुध्दा मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की सिमा मोहितकर हि मला कोणामार्फत रेल्वेमध्ये नोकरी लावून देणार आहे याबाबत सुध्दा मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की सिमा मोहितकर हिला पैसे दिल्यानंतर तिने लिहुन दिलेल्या स्टॅम्प पेपरवर माझा पूर्ण विश्वास बसला होता.

प्रश्न: जो पैसे स्विकारतो तोच पैशाची पोच देतो.
उत्तर: आम्ही संजय बनकर याला पैसे दिले होते.

५. हे म्हणणे खरे आहे की स्टॅम्प पेपरवर सिमा मोहितकर यांनी पैसे स्विकारल्यांनतर मला त्याची पोच स्टॅम्प पेपरवर लिहुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की ज्या खासगी वाहनाने आम्ही मुंबईला गेलो होतो त्या

खासगी वाहनाचा नोंदणीकृत क्रमांक व त्याच्या चालकाबाबत मला सांगता येणार नाही. सिमा मोहितकर यांनी लिहुन दिलेल्या स्टॅम्प संजय बनकर यांनी घेतला होता. ज्या स्टॅम्प पेपरवर सिमा मोहितकर यांनी पोच दिली होती तो स्टॅम्प पेपर बनकर याने घेतला होता पण किती स्टॅम्प पेपर घेतले होते याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की मी स्वत: स्टॅम्प पेपर घ्यायला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मुंबईला जाताना आरोपी आमच्यासोबत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मुंबईला जाताना आरोपी आमच्यासोबत होता हे दाखविण्यासाठी आम्ही खोटा स्टॅम्प पेपर खरेदी केला होता. हे म्हणणे खरे नाही की स्टॅम्प पेपरवरती सिमा मोहितकर करीता संजय बनकर याची मी खोटी सही केली होती.

६. हे म्हणणे खरे नाही की पैशाची देवाणघेवाण सिमा मोहितकर हिच्या घरी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की मी माझे चुलते शशिकांत रामकर यांच्याकडे पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की शशिकांत रामकर माझे चुलते असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी मी आरोपींचे खोटे नाव सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे चुलते शशिकांत रामकर हे रेल्वेमध्ये नोकरी लावून देण्यासाठी अभिकर्ता (एजंट) म्हणून काम करायचे. हे म्हणणे खरे नाही की शशिकांत रामकर याच्या सांगण्यावरून मी सिमा मोहितकर यांना पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की नोकरीचे काम होत नाही म्हणून माझे चुलते शशिकांत रामकर हे सिमा मोहितकर हिच्याकडे गेले होते.

प्रश्न: सिमा मोहितकर हिने शशिकांत रामकर यांच्या नावाने पाच लाख रूपयाचा चेक दिला होता.
उत्तर: चेक दिला होता पण तो किती रूपयाचा दिला होता याबाबत मला माहिती नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की ज्या माणसांला पैसे दिले जातात तोच माणूस पैसे देणा—याला धनादेश निर्गमित करतो. हे म्हणणे खरे नाही की या घटनेमध्ये आरोपीचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की तुम्हांला नोकरी लावून देतो तुम्ही पैसे भरा असे आरोपीने मला कधीही म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की शशिकांत रामकर माझे चुलते असून गावातील इतर लोकांनी सुध्दा शशिकांत रामकर यांना पैसे दिल्यामुळे शशिकांत रामकर यांना वाचविण्यासाठी मी आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासणीतील सर्व मजकूर मी

खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझेसोबत कधीही मुंबईला आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.
उलटतपास संपला

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : १२/०२/२०२० (एन. डी. मेश्राम)
घोडेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव